

प्रगती टाइम्स
वाई - सातारा - महाराष्ट्र
गुरूवार २४ सप्टेंबर २०२६ | RNI NO. MAHMAR/2011/40348
जाहिरातीसाठी संपर्क : ९९५६५७२५२२ website: www.pragatitimes.in संपादक : मिनल घोपसे पाटील

# लहान वयातच सायबर साक्षरता : Academic Heights च्या विद्यार्थ्यांना सायबर वॉरियर्सचे मार्गदर्शन

**कराड | विजया माने**

**कराड दि. २४ :** सध्याच्या काळात इंटरनेटचा वापर अभ्यास, संवाद आणि मनोरंजन या तिन्ही क्षेत्रांत झपाट्याने वाढला असून, लहान वयातच विद्यार्थी स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून डिजिटल जगाशी जोडले जात आहेत. हीच बाब लक्षात घेऊन Academic Heights Public School, Karad येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष सायबर जागरूकता उपक्रम आयोजित करण्यात आला. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील 'सायबर शक्ती क्लब'च्या माध्यमातून आयोजित या उपक्रमात ऑनलाईन जगात वावरताना माहितीची सुरक्षितता आणि जबाबदार डिजिटल सवयी यांवर विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## 'माझी माहिती, माझी जबाबदारी'

हा संदेश केंद्रस्थानी ठेवून सायबर फसवणुकीची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. आजच्या डिजिटल युगात वैयक्तिक माहिती ही सर्वात मौल्यवान संपत्ती असून, ती जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची स्वत:ची आहे, हा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. फिशिंग संदेश, अज्ञात लिंक, सोशल मीडिया खाते हॅक होणे आणि वैयक्तिक माहितीची चोरी अशा विविध धोक्यांकडे वेळीच लक्ष देण्याची गरज स्पष्ट करण्यात आली. याशिवाय अनोळखी कोपार्कावरून येणारे संदेश, बक्षीस किंवा ऑफरच्या नावाखाली होणारी फसवणूक आणि सोशल मीडियावरील खोटी माहिती ओळखण्यांचे कौशल्य याविषयीही चर्चा करण्यात आली. कोणतीही लिंक उघडण्यापूर्वी तिची खात्री करणे, वैयक्तिक तपशील जपून ठेवणे, आणि संशयास्पद ऑनलाईन संवादापासून सावध राहणे या बाबी वारंवार अधोरेखित करण्यात आल्या, जेणेकरून विद्यार्थ्यांच्या मनात ही तत्वे कायमस्वरूपी रूजतील.

**सायबर वॉरियर्स म्हणून अनिकेत** ढोत्रे आणि विशाखा गुज्ज यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी मजबूत व वेगळे पासवर्ड वापरणे, सोशल मीडियावरील गोपनीयता सेटिंग्ज जपणे आणि अनोळखी व्यक्तींशी ऑनलाईन बोलताना सतर्कता बाळगणे या मुद्द्यांवर सोप्या आणि रोजच्या उदाहरणांच्या भाषेत मार्गदर्शन केले.



कराड येथील Academic Heights Public School मध्ये आयोजित सायबर जागरूकता उपक्रमात सहभागी झालेके विद्यार्थी.

### सायबर सुरक्षिततेसाठी महत्वाचे मुद्दे

- मजबूत व वेगळे पासवर्ड वापरा
- सोशल मीडियावरील गोपनीयता सेटिंग्ज जपा
- अज्ञात लिंकवर क्लिक करू नका
- वैयक्तिक माहिती जपून ठेवा
- फिशिंग संदेश व बनावट ऑफर ओळखा
- सार्वजनिक वाय-फाय वापरताना सावध रहा
- दोन-टप्पी पडताळणी (टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन) वापरा
- अनोळखी व्यक्तींशी ऑनलाईन बोलताना सतर्कता बाळगा

पासवर्ड वारंवार बदलण्याचे महत्व, दोन-टप्पी पडताळणी (टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन) सारख्या सुरक्षा उपायांचा वापर आणि सार्वजनिक वाय-फाय वापरताना घ्यावयाची खबरदारी याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रश्नांमुळे संपूर्ण सत्र अधिकच संवादात्मक आणि रंजक झाले, आणि दैनंदिन डिजिटल वापराशी संबंधित अनेक शंकांचे निरसल यावेळी करण्यात आले.

Academic Heights Public School, Karad चे संचालक संजय जाधव आणि प्राचार्य सजाद मीर या प्रसंगी उपस्थित होते. त्यांनी अशा उपक्रमांचे महत्व अधोरेखित करताना, शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित इंटरनेट वापराची सवय' रूजवणे काळाची गरज असल्यांचे नमूद केले.

या उपक्रमाला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. 'सायबर शक्ती क्लब'च्या शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे यांनी उपक्रमाच्या संपूर्ण समन्वयाची जबाबदारी सांभाळली आणि हा उपक्रम यशस्वीपणे पार पडावा यासाठी विशेष परिश्रम घेतले.